# Fr. Agnel School

Waliv, Vasai (E)

**Std.: VIII I Unit test Date : 25/08/21 Sub : Marathi Marks: 20**

**प्र.१) उचित पर्याय शोधून लिहा.** **(8)**

१) करपवून टाकणारे ऊन केव्हा असते?

अ) चैत्र आ) वैशाख इ) ज्येष्ठ

२) काटेसावरीच्या फुलातील परागणांपासून _____ रंग मिळत असे.

अ) पिवळा आ) जांभळा इ) भगवा

३) पसरणारा सुवास ______

अ) आपुलकीचा आ) मैत्रीचा इ) अस्तित्वाचा

४) माणसाच्या जीवनव्यवहारात मदत करणारी –

अ) जिव्हाताई आ) नासिका इ) कर्णिका

५) 'फरफट होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ –

अ) तक्रार करणे आ) गैरसोय होणे इ) झोप येणे

६) 'हिरमोड होणे' या वाक्प्रचाराचा अर्थ –

अ) नाराज होणे आ) आनंद होणे इ) उत्साह येणे

७) 'मुलांनो, रांगेत चला' या वाक्याचा प्रकार ओळखा.

अ) विधानार्थी वाक्य

आ) उद्गारार्थी वाक्य

इ) आज्ञार्थी वाक्य

८) 'तुला आंबा आवडतो का?' वाक्याचा प्रकार ओळखा.

अ) प्रश्नार्थी वाक्य

आ) आज्ञार्थी वाक्य

इ) विधानार्थी वाक्य

**प्र.२) खालील उतारा वाचून सूचनेनुसार कृती करा.**

**१) कोण ते लिहा.** **(1)**

i) तातडीने सर्वांची सभा घेणारे –

ii) अजिबात काम न करण्याचा आरोप असलेले –

**(सर्वजण मेंदूराजे यांच्याकडे जातात. त्यानंतर मेंदूराजे तातडीने सभा घेतात)**

**सर्वजण** : मेंदूराजेसाहेबांचा जयजयकार असो!

**मेंदूराजे** : बसा मंडळी. पोटोबा प्रधान आले, की नाही अजून!

**पोटोबा** : मी केव्हाच हजर आहे महाराज.

**मेंदूराजे** : पोटोबा, या सर्व मंडळींची तुमच्या बद्दल तक्रार आहे, की तुम्ही अजिबात काम करत नाही. नुसतं खाता आणि दुसऱ्यांवर गुरगुरता.

**पोटोबा** : महाराज बोलताना जरा बेअदबी होतेय, कसूर माफ असावी; पण मी काम करत नाही हे म्हणणं साफ खोटं आहे. हो, अधूनमधून मी गुरगुरतो; पण ते यांच्यावर नव्हे. ती माझी सवय आहे.

**२) कारण लिहा.** **(1)**

(i) पोटोबा अधूनमधून गुरगुरतो, कारण.....

**३) स्वमत.** **(2)**

पोटोबाबद्दल तक्रार सांगून सर्व इंद्रियांनी ती तक्रार करण्याची कारणे लिहा.

**प्र.३) खालील कविता वाचून सूचनेनुसार कृती करा.**

**१] आकृतीबंध पूर्ण करा.** **(2)**



हे ज्ञानाचे तेज पसरले नव्या युगाच्या नभात
कला-गुणांच्या क्षितिजावरती ही प्रतिभेची प्रभात.
भव्य पटांगण, बाग मनोहर
फुला-पाखरांचे जग सुंदर
आपुलकीचा सुवास पसरे
मनामनांतून इथे निरंतर.
गुरुजनांची अमुल्य शिकवण या स्पर्धेच्या युगात,
कला-गुणांच्या क्षितिजावरती प्रतिभेची प्रभात.

**२] स्वमत**. **(2)**

तुम्हाला कळलेली कवीची प्रगतीची नवपरिभाषा कोणती?

**प्र.४) पुढील विषयावर निबंध लिहा**. (**कोणताही १)** **(4)**

१] शाळेतील बाकाचे आत्मवृत्त

**मुद्दे** : निर्मिती – भूतकाळ - आजची परिस्थिती – महत्व - इतरांची भावना – दुःख

२] पिंजऱ्यातील पक्ष्याचे आत्मवृत्त

**मुद्दे** : जन्म – पूर्वीचे आनंदी जीवन - आताची स्थिती - दुःख